RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष १, अंक ५१] बुधवार, डिसेंबर २३, २०१५/पौष २, शके १९३७ [पृष्ठे ७ किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ८३**

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले
(भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर)
वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/जीइपीएल/२०१५.— विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (डी) सह कलम १६ आणि कलम १४ च्या खंड (बी) मधील अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे खालील विनियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ —**

१.१. या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. (जीइपीएल), ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] विनियम, २०१५" असे म्हणावे ;

१.२. हे विनियम भारत सरकार, वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली यांच्या दिनांक ११ जून २०१३ च्या एसइझेड अधिसूचना क्र. एस.ओ.१६९५ (ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी लागू राहतील.

१.३. हे विनियम शासकीय **राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिद्ध होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या —**

२.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(ए) " **अधिनियम** " म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) ;

(बी) " **विकासक** " चा अर्थ, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (जी) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील ;

(सी) " **मानीव वितरण परवानाधारक** " म्हणजे जीइपीएल, ज्यांना भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४९ अंतर्गत निर्गमित केलेल्या दिनांक ३ मार्च २०१० च्या अधिसूचना क्र. एसओ. ५२८ (इ), द्वारा विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ च्या खंड (बी) अंतर्गत, एसईझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना वीजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे ;

(डी) " **सर्वसाधारण अटी** " म्हणजे, वेळोवेळी अंमलात असलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी ;

(ई) " **जीइपीएल** " म्हणजे कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत नोंदणी झालेली आणि भारत सरकार, वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली यांनी निर्गमित केलेल्या दिनांक ६ जानेवारी २०१२ च्या पत्रान्वये आणि अधिसूचना क्र. एस. ओ. १६९५ (ई), दिनांक ११ जून २०१३ अन्वये माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राकरिता विकासक म्हणून मान्यता दिलेली ' मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रायव्हेट लिमिटेड ';

(एफ) " **एसइझेड अधिनियम** " म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ ;

(जी) " **एसइझेड नियम** " म्हणजे वेळोवेळी अंमलात असलेले विशेष आर्थिक क्षेत्र नियम, २००६.

२.२ (अ) या विनियमांत वापरलेल्या आणि ज्यांची व्याख्या करण्यात आलेली नाही अशा शब्द आणि उक्तींना, विद्युत अधिनियम, २००३ आणि विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांनुसार, अर्थ राहील.

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

३. **व्याप्ती —**

' जीइपीएल ' च्या संदर्भातील या विशिष्ट अटी आणि आयोगाने अधिसूचित केलेल्या वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी या ' जीइपीएल ' च्या वीज वितरण परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि त्या येथे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये त्यांच्या वीजेचे वितरण आणि किरकोळ पुरवठ्याच्या कार्याचे नियमन करतील.

४. **" वितरणाचे क्षेत्र " किंवा " पुरवठ्याचे क्षेत्र " —**

४.१ मानीव वितरण परवानाधारकाने वीजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले वीज पुरवठ्याचे क्षेत्र हे भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय (वाणिज्यिक विभाग) यांनी, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४ अंतर्गत निर्गमित केलेल्या एसइझेड अधिसूचना क्र. एस. ओ. १६९५ (ई), दिनांक ११ जून २०१३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, सदर अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबी यांच्या अधीन राहून, प्लॉट क्र. आयटी-५, ऐरोली, नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया ऐरोली, जिल्हा ठाणे येथील ११.७४ हेक्टर्सचे संपूर्ण क्षेत्र राहील. हे क्षेत्र सोबतच्या अनुसूची-१ मधील नकाशामध्ये अधिक तपशीलासह आरेखित करण्यात आले आहे ;

४.२ भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाकडून मानीव वितरण परवानाधारकासाठी भविष्यात एसईझेड अधिसूचना किंवा निरधिसूचना काढण्यात आल्याने, एसइझेड, क्षेत्रामध्ये बदल झाला तर, मानीव वितरण परवानाधारक अशा अधिसूचना/निरधिसूचनेच्या १५ दिवसांच्या आत " जीइपीएल " च्या संबंधातील या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी आयोगाशी संपर्क साधेल ;

४.३ निरधिसूचना काढण्यात आल्यास, मानीव वितरण परवानाधारक निरधिसूचित क्षेत्रातील ग्राहकांना वीज पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येईपर्यंत एसइझेड क्षेत्रातील ग्राहकांना वीजेचा पुरवठा चालू ठेवील.

५. **परवान्याची मुदत —**

सदर परवाना, अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून दिनांक ११ जून २०१३ पासून (म्हणजेच एसइझेड अधिसूचनेच्या दिनांकापासून) दिनांक १० जून २०३८ पर्यंतच्या पंचवीस (२५) वर्षांच्या कालावधीकरिता किंवा असा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल, त्या कालावधीकरिता अंमलात राहील.

६. **विशिष्ट अटी आणि परवान्याची पाहणी —**

या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकानंतर लगेच मानीव वितरण परवानाधारक या विशिष्ट अटी व त्याचा परवाना, मंजुऱ्या किंवा मान्यता जनतेला पाहणी करण्याकरिता उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करील.

७. **अखंडित वीजेचा पुरवठा —**

मानीव वितरण परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात चोवीस (२४) तास अखंडित वीजेचा पुरवठा करण्यासाठी व्यवस्था करील.

८. **दुरुस्ती करण्याचे अधिकार —**

आयोग, कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतुदीमध्ये बदल, फेरफार, अल्प-बदल आणि सुधारणा करू शकेल.

९. **अडचणी दूर करण्याचे अधिकार —**

या विनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, विद्युत अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

**अश्वनी कुमार,**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,
दिनांक १७ डिसेंबर २०१५.

Annexure-A

Enclosure to Approval letter No. SEEPZ/NEDSEZ/6T/GA-THANE/3324/2010-11/Vol. III dated 18.12.2013

